सामना

पुणे, शुक्रवार, दि. १७ जुलै २०२६

# भरतनाट्यम्च्या माध्यमातून पांडुरंगाची उपासना



**पुणे** : फ्युएल शिक्षण संस्थेतर्फे 'माउली-एक कालातीत परंपरा' हा भक्ती, परंपरा, कला व ईश्वर यांच्यातील संबंधाचा उत्सव आयोजित करण्यात आला होता. पंढरपूर वारीचा आत्मा जिवंत करणारी ही कला आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या भरतनाट्यम् नृत्यांगना, नृत्यदिग्दर्शिका आणि संशोधक कलाईमामनी बालादेवी चंद्रशेखर यांच्या विशेष सादरीकरणातून अनुभवायला मिळाली. याप्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. केतन देशपांडे, मयुरी देशपांडे, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे सीईओ सचिन अंबरडीकर, अमित वाजगे, चंद्रशेखर बलरामन उपस्थित होते. सूत्रसंचालन स्मिता कुलकर्णी यांनी केले.